# पुणे पीपल्स को ऑप. बँक लि., पुणे

(मल्टीस्टेट बँक )
मुख्य कार्यालय: ४७७ व ४७८, मार्केटयार्ड, गुलटेकडी, गेट नं ४,
पुणे ४११०३७. फोन: ७०६६०५०९९९/७०६६०५१९९९
Website: www.punepeoplesbank.com

## बँकेच्या सर्व सभासदांसाठी

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

पुणे पीपल्स को–ऑप. बँक लि., पुणे या संस्थेची ७२वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १७ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता दि पुना मर्चंट्स् चेंबर, व्यापार भवन सी–५०, मार्केट यार्ड, पुणे ४११०३७ येथे खालील विषयांचा विचार करून निर्णय घेण्यासाठी होणार आहे. सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

सभेपुढील विषय :

१. दि. १७ जुलै २०२२ रोजी झालेल्या ७१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दिनांक ३१ मार्च, २०२३ अखेर
   अ) संचालक मंडळाचा अहवाल व लेखापरीक्षित ताळेबंद स्वीकृत करणे
   ब) लेखापरीक्षित नफा तोटा पत्रक स्वीकृत करणे
   क) मा.वैधानिक लेखा परीक्षकांच्या अहवालाची नोंद घेणे.
३. मा. वैधानिक लेखा परीक्षकांच्या सन २०२१–२२ वर्षाकरिताच्या दोष–दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
४. संचालक मंडळाने सुचविलेल्या ३१ मार्च, २०२३ या वर्ष अखेरीच्या नफा विनियोगास मान्यता देणे.
५. सन २०२४–२५ या वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक यांचे नेमणुकीसंदर्भात रिझर्व बँकेकडे विहीत मुदतीत प्रस्ताव सादर करणे व मेहेनताना ठरविणे.
६. सन २०२३ – २४ च्या वार्षिक अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७. मल्टीस्टेट को ऑप. सोसायटीज अॅक्ट २००२ कलम ३९ (३) नुसार बँकेच्या संचालकांना व त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक वर्ष २०२२–२३ मध्ये दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
८. अ) बँकेच्या एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या प्रकरणांची नोंद घेवून मान्यता देणे.
   ब) सुधारीत एकरकमी कर्ज परतफेड योजनेची माहिती घेऊन मान्यता देणे व सदर कालावधी निश्चित करणे.
९. बँकेच्या उपविधी (बाय लॉज्) मध्ये सुचविलेल्या दुरुस्तींबाबत विचार करणे.(मा. रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मान्यते अधीन राहून )
१०.. ज्या सभासदांकडे १० पेक्षा कमी समभाग आहेत अशा सभासदांची आवश्यक भागसंख्या करुन घेणे किंवा भाग रक्कम अनामत खाती जमा करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
११. सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांच्या रजेस मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्षांचे अनुज्ञेने आयत्या वेळचे विषय.

मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार
विजयकुमार शेळके
मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र)

ठिकाण : पुणे,
दिनांक : ०१.०९.२०२३

---

टीपा:

१. गणसंख्ये अभावी सभा तहकूब केल्यास, त्यानंतर अर्ध्या तासाने ठीक १०.३० वाजता त्याच ठिकाणी सभा सुरु होईल आणि अशा सभेस गणसंख्यापूर्ततेची आवश्यकता असणार नाही.
२. सन २०२२–२३ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक,इ.बँकेच्या **www.punepeoplesbank.com** या वेबसाईटवर वर प्रसिद्ध करण्यात आला आहे.
३. वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या शाखांमध्ये व मुख्य कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.
४. सभेत होणाऱ्या कामकाजाबाबत सूचनेमध्ये निर्देशिलेल्या बाबींसंबंधी जरूर ती कागदपत्रे बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये दिनांक ०५ सप्टेंबर २०२३ पासून दिनांक ०९ सप्टेंबर २०२३ पर्यंत कामकाजाच्या वेळेत पाहण्यास मिळतील.
५. सभेच्या वेळी विषयपत्रिकेतील बाबींसंबंधी विचारावयाची माहिती दिनांक ०९ सप्टेंबर २०२३ पर्यंत, कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत मुख्य कार्यालयाकडे प्रश्नरुपाने लेखी कळविल्यास त्याप्रमाणे माहिती तयार ठेवणे सोयीस्कर होईल.